दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

**(कालमर्यादा : ३१.०७.२०२०)**

जा क्र विकापु/लले/गोप/वागोअ/२०२०-२१/ 66
दिनांक :- 22/05/2020.

**परिपत्रक**

**विषय : वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल २०१९-२० बाबत...**

**संदर्भ** : १. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा दिनांक ०१/११/२०११
२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२११/प्र.क्र.२१७/२०१०/तेरा दिनांक १७/१२/२०११
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमाक सीएफआर १२११/प्र.क्र.२५७/तेरा दिनांक ०२/०२/२०१७
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा दिनांक ०७/०२/२०१८
५. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. विकापु/लले/गोप/वागोअ/२०१९-२०/४८ दिनाक २७/०२/२०२०
६. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.सीएफआर १२२०/प्र.क्र.३२/का.१३ दिनांक २३/०४/२०२०

तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व **शासकीय संस्थांना** सूचित करण्यात येते की, त्यांना संदर्भ क्रमांक ५ अन्वये त्यांच्या संस्थामधील गट ब (अराजपत्रित), गट क आणि गट ड कर्मचाऱ्यांचे सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन अहवाल/टिपणे **दिनांक ३०/०४/२०२० पूर्वी या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. तरी संदर्भ क्रमांक ६ च्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० चे कार्यमुल्यमापन अहवाल/टिपणे सुधारित वेळापत्रकान्वये दिनांक ३१/०७/२०२० पर्वी या कार्यालयास सादर करावयाची आहेत.**

सन २०१९-२० च्या कार्यमूल्यमापन अहवालाची कार्यवाही ही संदर्भ क्रमांक ६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या वेळापत्रकानुसारच पूर्ण करावयाची आहे.

सन २०१९-२० च्या कार्यमूल्यमापन अहवालाबाबतची कार्यवाही विहित कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक आहे. उपरोक्त संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णय मधील तरतूदीनुसार सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याचे वेळापत्रक विचारात घेता, **राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे सन २०१९-२० चे कार्यमूल्यमापन प्रतिवेदित/पुनर्विलोकित न केल्यामुळे १ जुलै, २०२० रोजी देय होणारी वेतनवाढ रोखण्यात येऊ नये.**

कार्यमूल्यमापन अहवालाबाबतची कार्यवाही वेळेत पूर्ण करण्यासाठी प्राचार्यांनी संस्था स्तरावर सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन, कार्यमूल्यमापन अहवालाचे कामकाज विहित कालमर्यादेत करणेबाबतच्या सूचना द्याव्यात व उपरोक्त संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयामधील वेळापत्रकाचे अचूक पालन करावे व त्यानुसार **या कार्यालयाकडे प्रतिवेदनार्थ व पुनर्विलोकनार्थ सादर करण्याचे गोपनीय अहवाल दिनांक ३१/०७/२०२० पर्यंत विहित कालमर्यादेत या कार्यालयास सादर करावेत.**

( डॉ. दिलीप नंदनवार )
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
२) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
३) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी
४) प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड
५) शासकीय तंत्रनिकेतन, पुणे/सोलापूर/कोल्हापूर/कराड/मिरज/अवसरी
६) प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव
७) प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे
८) प्राचार्य, महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे
९) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत श्री. सं.ना.शिंदे, प्रोग्रॅमर, संगणक विभाग, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.